# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


Volume-II, February 2019 (Special Issue)



✣ EDITOR IN CHIEF ✣

DR. M. RAGHIB DESHMUKH

✣ GUEST EDITOR ✣

DR. BALASAHEB JADHAV



www.scholarsimpact.com

: Organised by :

Department of Political Science

M.S.P. Mandal's

SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)

(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 41. | ब्रिटीश राजवटीतील स्त्रियांच्या मानवी हक्क संरक्षणाचे कायदे<br>प्रा. यादव परमेश्वर दत्तात्राव | 143 –147 |
| 42. | लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. | 148 –150 |
| 43. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | 151 –154 |
| 44. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>बावचकर ऋतुजा पांडूरंग | 155 –158 |
| 45. | भारतीय लोकशाही आणि महिला सहभाग व संघटना<br>डॉ. सटाले एस.एन. | 159 –161 |
| 46. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>डॉ. एस.एन. आकुलवार | 162 –163 |
| 47. | भारतीय लोकशाही व दहशतवाद<br>डॉ. किरण चक्रे | 164 –169 |
| 48. | भारतीय लोकशाही व धर्माचे राजकारण<br>श्रीमती स्वाती बोकारे | 170 –171 |
| 49. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. तुकाराम एकनाथराव बोकारे | 172 –175 |
| 50. | महाराष्ट्र विधिमंडळ महिला सहभाग<br>प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही. | 176 –179 |





Scanned with CamScanner

(45)

# भारतीय लोकशाही आणि महिला सहभाग व संघटना

डॉ.सटाले एस.एन.
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
र.भ.अट्टल महाविद्यालय,
गेवराई जि.बीड

❖ प्रस्तावना :

लोकशाही ही भारताची प्राचीन व्यवस्था आहे. इतिहासात स्थानिक पक्ष समुहांची नोंद दिसते. ब्रिटिश राजवटीचा प्रभाव भारतीय राजकारणावर होता. इ.स. 1885 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली नंतर हिंदू महासभा, मुस्लीम लीग, शेड्युल कास्ट फेडरेशन सारखे राजकीय पक्ष उदयास आले. स्वतंत्र भारतात लोकशाही व्यवस्थेत या पक्षांना अत्यंत महत्व आहे. विरोधी पक्षास लोकशाही नियंत्रण व विकासाचा कणा संबोधला जातो. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षात भयंकर वाढ झाली. वर्तमान स्थितीत तर प्रादेशिक पक्षांची संख्या प्रचंड वाढली त्याचे बळ, सामर्थ्य ही वाढत आहेत.

❖ राजकीय पक्ष आणि महिला

जगात सर्वत्र पुरुषसत्ताक पध्दतीचे वर्चस्व प्राचीन काळापासुन दिसून येते. अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्सच्या सर्वच लोकांना मतदानाचा अधिकार नव्हता. अतिशय प्रगत समजल्या जाणाऱ्या इंग्लंड आणि अमेरिकन महिलांना, गुलामांना ते अधिकार प्राप्त करण्यासाठी अनेक शतके वाट पाहावी लागली. समाजातील अनेक गटांना संपत्ती, शिक्षण व लिंग तथा व्यवसाय आदी अधिकारावर मताधिकार मिळत गेले. अमेरिकेत हिलेरी क्लिंटन सारख्या अनेक महिलांना राष्ट्राध्यक्षपदासाठी पक्ष उमेद्वारी मिळवायला 200 वर्षे वाट पाहावी लागली. जगात सर्वप्रथम न्यूझीलंडने 1893 पहिल्यांदा सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार दिला. स्वातंत्र्यानंतर 60 वर्षानंतर भारतात जरी संसदेत महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाची मागणी होवु लागली तरी 1952 पासूनच डॉ. बाबासाहेबांच्या कृपेने महिला उच्चपदासाठी निवडणूक लढू शकत होत्या. नविन धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण हे शासनाने उचलेले पाऊल स्वागताई आहे.

असे असले तरीही जगातील सर्वच लोकशाहीप्रधान देशात महिलांचा सहभाग 10 टक्के च्यावर संसदेत दिसत नाही. भारतातही स्वातंत्र्यापासून आजपावेतो संसदेत हा आकडा 10 टक्के पोहचला नाही ह्याचा अर्थ पुरुषी मानसिकता अजूनही महिलांकडे दुय्यम पध्दतीने बघते. महिलांच्या नेतृत्वावर पुरुषी समाजाचा विश्वास नसावा काय ? असा प्रश्न निर्माण होतो. 1952 ते आजपर्यंत संसदेत 500 ते 600 स्त्रियांनी उमेदवारी निवडणूक लढविल्या व 500 च्या जवळपास महिला खासदार झाल्या. महाराष्ट्र राज्य विधानसभेचीही संख्या 7 टक्के ते 8 टक्के च्या वर कधीही गेली नाही. लोकसंख्येच्या बाबतीत तुलना केली असल्यास स्त्रियांची संख्या 50 टक्के, पण राजकारणात सहभाग मात्र केवळ 10 टक्के हे केवळ न उलगडणारे कोडेच वाटते.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होताच स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यात आली. या राज्यघटनेमध्ये महिलांना समानतेचा हक्क प्राप्त झाला. म्हणजेच कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता पुरुषांप्रमाणेच महिलांना हक्क प्राप्त झाले; परंतु भारतात मनुस्मृतीपासूनच चालत आलेल्या अनेक रुढी, प्रथा व परंपरांनी भारतीय स्त्रीला जखडून ठेवले होते. येथील समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांवर अनेक बंधने घालण्यात आली होती. त्यामुळे त्यांना राज्यघटनेने दिलेल्या हक्कांचा उपयोग घेता येत नव्हता.

इंग्लंडसारख्या लोकशाहीची जननी असणाऱ्या देशातील महिलांनासुध्दा मतदानाच्या हक्कासाठी संघर्ष करावा लागला; परंतु भारतीय घटनाकारांनी येथील महिलांना हा अधिकार स्वातंत्र्याबरोबरच प्रदान केला; परंतु भारतीय स्त्रिया राजकारणात मोठया प्रमाणात सहभागी होवू शकल्या नाहीत; कारण परंपरेने चालत आलेली बंधने, स्त्रियांकडे पाहणाचा समाजाचा दृष्टिकोन, स्त्रियांनी केवळ घर सांभाळावे, 'चूल आणि मूल' हे स्त्रीचे कार्यक्षेत्र



Scanned with CamScanner

निश्चित केले होते. तसेच महिला साक्षरतेचे प्रमाण फारच कमी होते. त्यामुळे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग अत्यल्प राहिला. अगदी मतदानाचा हक्कसुध्दा पतीच्या इच्छेनुसारच वापरत असत.

इ.स. 1975 नंतर जागतिक स्तरावरुनच महिला सबलीकरणाची प्रकिया वेगाने सुरु झाली. त्यामुळे भारत सरकारनेही स्त्री सबलीकरणासाठी विविध कायदे व उपाययोजना करण्यास सुरुवात केली.

राजकारणात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी स्व.राजीव गांधी यांनी घेतलेला निर्णय महत्वाचा आहे. ते म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना आरक्षण देणे तेव्हा 1992 मध्ये 73 वी व 74 वी घटनादुरुस्ती केली व त्यानुसार 33 टक्के महिला स्थानिक स्वराज संस्थेत कार्यरत झाल्या. महाराष्ट्रात यावर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना 50 टक्के आरक्षण लागु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संपूर्ण भारतात हा निर्णय घ्यावा यासाठी केंद्रीय शासनानेच महिलांना 50 टक्के आरक्षण द्यावे असा निर्णय घेतला आहे.

❖ महिला संघटनांचा जन्म

राजकीय आंदोलनात सहभागी होवू लागलेल्या स्त्रियांना स्वतःमधील सुप्त सामर्थ्यांचा व क्षमतांचा साक्षात्कार होवू लागला. यातूनच महिला संघटनांचा जन्म झाला. या मुख्यत्वे तीन प्रकारच्या होत्या.

❖ नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन इन इंडिया (1925)

ही संघटना ब्रिटिश सरकारच्या आश्रयाने चालत असे. कलेक्टरची पत्नी या संघटनेची अध्यक्ष असे. विविध विधायक कार्य संघटनेतर्फे हाती घेतली जात.

❖ ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स (1927)

या संघटनेची स्थापना 1927 साली झाली. सुरुवातीला संघटनेचे अध्यक्षपद राण्या–महाराण्या मुख्यतः नंतर मात्र स्वातंत्र्य चळवळीतील नेत उदा. सरोजिनी नायडू, कमलादेवी चटटोपाध्याय, अनसूयाबाई काळे, अरुणा असिफ अली, हंसा मेहता इत्यादी यात सहभागी झाल्या व त्यामुळे संघटनेला व्यापक स्वरुप मिळाले. संघटनेच्या देशभर शाखा सुरु झाल्या. स्त्रियांमध्ये शिक्षक प्रसार, मालमत्तेचा हक्क, रुढी–परंपरांच्या जोखडातून मुक्ती इत्यादी विषय संघटनेच आग्रह राहिले.

❖ भारतातील समकालीन स्त्रीवादी चळवळ (1970 नंतर)

स्वातंत्र्य मिळून 20 – 25 वर्षे झाल्यावरही भारतीय स्त्रीची स्थिती सुधारली नव्हती. देशात इंदिरा गांधीच्या रुपाने पहिली महिला पंतप्रधान झाली तरी सर्वसामान्य स्त्री मात्र हलाखीचेच जीणे जगत होती. 1974 साली संसदेने नियुक्त केलेल्या 'भारतीय स्त्रीचा दर्जाविषयक समिती' ने ही आपल्या अहवालात तसा स्पष्ट उल्लेख केला होता. याच सुमारास डाव्या विचारांच्या पक्ष संघटनांमध्ये फुटी पडल्या होत्या. यातून स्थापन झालेले विविध गट तळागाळातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयास करु लागले होते. या सर्व प्रकियेतून नवीन सामाजिक चळवळींचा जन्म झाला. या चळवळी समकालीन स्त्रीवादी चळवळीला मोठा आधार देवून गेल्या. याची काही ठळक उदाहरणे पुढीलप्रमाणे–

भारतातील स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा आढावा

स्त्रियांच्या राजकीय सहभाग व हक्कांसाठी ब्रिटिशकाळापासून विविध प्रकारचे प्रयत्न होत आलेले दिसतात. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

"1917 साली भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधी मंडळाने लॉर्ड मॉन्टेग्यू यांची भेट घेवून स्त्रियांसाठी मताधिकाराची मागणी केली."

1920 साली संपत्तीदार स्त्रियांना मताधिकार बहाल केला गेला. मात्र त्यांना विधिमंडळात प्रवेश नव्हता.

1930 साली 'वूमेन्स इंडिया असोशिएशन च्या प्रतिनिधींच्या सततच्या पाठपुराव्याने विधिमंडळ प्रवेश स्त्रियांना खुला झाला. 'मुथुलक्ष्मी रेडडी या पहिला प्रतिनिधी म्हणून विधिमंडळावर कार्यरत झाल्या.'

'1930 साली इंग्लंड येथे आयोजित गोलमेज परिशदेत बेगम जहानआरा शाहनवाझ व राधाबाई सुब्बरायन या स्त्री कार्यकर्त्यांनी स्त्रियांसाठी विधिमंडळांमध्ये 5 टक्के आरक्षणाची मागणी केली.'

1935 च्या भारत सरकार कायद्याद्वारे स्त्रियांच्या मताधिकाराचा व विधिमंडळ प्रवेशाचा पाया व्यापक केला गेला. या कायद्याअंतर्गत घेण्यात आलेल्या प्रान्तिम विधीमंडळाच्या निवडणुकांतून एकूण '56 स्त्रिया प्रतिनिधीक विधीमंडळ सदस्य बनल्या. याशिवाय 30 स्त्रिया केंद्रीय विधीमंडळावर निवडून गेल्या.'

1950 च्या स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना समान घटनात्मक अधिकार बहाल केले. मात्र स्त्रियांसाठी प्रतिनिधीमंडळात आरक्षण नाकारले. 1992 च्या 73 व 74 च्या घटनादुरुस्त्याद्वारे स्थानिक स्वराज्य



Scanned with CamScanner

संस्थांमध्ये स्त्रियांना 33 टक्के आरक्षण देण्यात आले. आज त्यामुळे दहा लाख स्त्रिया राजकारणात प्रवेश करत्या झाल्या आहेत.

❖ भारतीय स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी काही उपाय

1. महिलांना संसदेत व विधानसभेत 30 टक्के पेक्षा अधिक आरक्षण कायद्याने द्यावे.
2. महिलांना राजकीय आरक्षण देतांना त्या–त्या समाजघटकातही राखीव जागा दिल्या जाव्यात.
3. महिलांना महत्वाची मंत्रीपदे दिली जावी व किमान 30 टक्के मंत्रीपदे महिलांसाठी राखीव ठेवली जावी.
4. तरुण मुलींमधून महिला नेतृत्व घडावे यासाठी महिला नेतृत्व प्रशिक्षित शिबीरांचे आयोजन केले जावे. याकरिता शासनाने व एन.जी.ओ. नी प्रयत्न करावेत.

❖ सारांश :

आज एकविसाव्या शतकात आपण पोहोचलो आहोत. त्यापूर्वीच्या दोन शतकात जगभरातील स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी, समतेसाठी किती प्रदीर्घ संघर्श केला याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक आहे. घटनात्मक वा कायदेशीरदृष्टया समान हक्कांची प्राप्ती, हा या संघर्शातून चळवळीतून झालेला अत्यंत महत्वाचा लाभ. मात्र 21 व्या शतकातही स्त्रीचे स्थान खऱ्या अर्थाने समान झाले आहे का ? याचे उत्तर दुदैवाने नकारात्मकच द्यावे लागेल. त्यामुळेच स्त्रियांच्या हक्कांच्या संघटित चळवळीची आजही आवश्यकता आहे. स्त्रियांच्या हक्कासंच्या जपणुकीसाठीच नव्हे तर तिचे सत्व व स्वत्व जपण्यासाठी संघटित चळवळ अपरिहार्य आहे.

❖ संदर्भ सूची :

1. गर्गे शो.सं., समाज विज्ञान कोश खंड–8
2. स्टडी सर्कलद्धारा प्रकाशित, स्पर्धा परिक्षा, जून 2011.
3. महाराष्ट्रातील पंचायतराज आणि महिला आरक्षण डॉ.कांताराव पोले
4. महन्ता अपर्णा, 1994, द. इंडियन स्टेट अँड पॅट्रिआर्की, सत्यमूर्ती (संपा.) स्टेट अँड नेशन इन द कॉन्टेक्सट ऑफ सोशल चेन्ज, ऑक्सफर्ड, दिल्ली, पृ.63.
5. बॅनर्जी निर्मला, 1998, ड्रिम्ज ऑफ मॉडर्निटी : विमेन अँड द नेहरुवियन इरा, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली (इपीडब्ल्यु), खंड–33, पृ.17.



Scanned with CamScanner